Peer Reviewed

ISSN 2455-8850

# MARGINALITY

Quarterly-Vol.4 ○ Issue 1 ○ 20 Aug. - 19 Oct. 2019 ○ Rs.100/-

*International Interdisciplinary Multilingual Research Journal*

**Editor**
**Siddharth G.Kaninde**

# INDEX



| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | DEVELOPMENT OF INDIAN BANKING SECTOR: PRE AND POST PRIVATIZATION | Dr.Kailas Kaninde | 01 |
| 02 | IMPACT OF GLOBAL RECESSION ON INDIAN BANKING SECTOR | Dr.Sidharth Jadhav | 09 |
| 03 | Book review, M.D. David, *Torch bearers of the Deccan blazing up the northern skies (1857 in Maharashtra – A history)* | Ganesh Narkulwad | 13 |
| 04 | Role of Religion In Social Development | Mr. Jayesh R. Jadhav | 15 |
| 05 | A STUDY OF THE SOCIOLOGICAL PERSPECTIVE : VADAR SOCIOTY AND SOCIAL CHANGE | Dr.Kailas Kaninde | 20 |
| 06 | ''डॉ. आंबेडकरांचे कृषीविषयक विचार आणि शेती संबधित सरकारचे धोरण'' | प्रा. डॉ. प्रदीप एच. गजभिये | 25 |
| 07 | 'धग' कादंबरीतील व्यक्तिचित्रण | प्रा.डॉ.राजु श्रावण मोतेराव | 30 |
| 08 | बौद्ध धम्माची शिकवण | प्रा. प्रदिप माधवराव एडके | 33 |
| 09 | स्त्रियांच्या हक्कांबाबतचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा. आनंदा कांबळे | 38 |
| 10 | भीम गीतातून अभिव्यक्त होणारे भीम दर्शन | प्रा.डॉ. जाधव ज.तु. | 42 |
| 11 | बहुजन समाज पक्षाची विचारधारा : एक चिकित्सक अभ्यास | प्रा.डॉ. विशाल रावसाहेब पंतगे, कांबळे तेजस देवबाराव | 47 |
| 12 | ग्रंथालय व माहिती व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काळाची गरज | प्रा.प्रकाश लाभसेटवार | 50 |

# भीम गीतातून अभिव्यक्त होणारे भीम दर्शन

**प्रा.डॉ. जाधव ज.तु.**
मराठी विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

पृथ्वी पाठीवरच्या या जगात अनेक युग पुरूष होऊन गेले. हे निसंशय सत्य नाकारता येत नाही. प्रत्येक युग पुरूषांने आपल्या कुवती नुसार समाज परिवर्तनाच्या दिशा दिल्या आहेत. स्थल, काल, देशपरत्वे सामाजिक संदर्भ आणि समस्या वेगळया आहेत. पण भारतात जी धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था आहे, अशी समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्था जगाच्या पाठीवर कुठेच पहायला मिळत नाही. अंत्यत किचकट आणि विषम जातीव्यवस्था इथल्या धर्म व्यवस्थेचे वैशिष्टये आहे. चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे इथली समाजव्यवस्था अंत्यत खिळखिळी झाली होती नि ती आहे, हे उघड सत्य आहे. या विषम व्यवस्थेला हादरे देण्याचे आपापल्या परिने १९ व्या शतकात महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज यांनी प्रयत्न केले, हे विसरता येत नाही. आणि अडीच हजार वर्षापूर्वी म.गौतम बुध्दाने भारतामध्ये सर्वप्रथम मानव मुक्ती लढयाची भक्कम मुहूर्त मेढ रोवली, हे ही नाकारता येत नाही. पण या सर्वांचा समर्थ विचार आपल्या खांद्यावर घेऊन समाजव्यवस्थेची घडी निट बसविण्याऱ्या श्रेष्ठ परंपरा जन्माला आल्या नाहीत, याची खंत वाटते.

म्हणूनच पुन्हा एकदा विषम व्यवस्था भारतामध्ये आपली पाळंमुळं अधिक घट करू शकली आणि पुन्हा एकदा भारताची अधोगती झपाटयाने सुरू झाली. यामध्ये मानवी मूल्य पायदळी तुडविले गेले. येथील शुद्रांना अतिहिन समजल्या जाणाऱ्या कुत्र्या, मांजरापेक्षाही हिन लेखले जाऊ लागले. ज्या माणसांचे माणुसपण नाकारले गेले. त्यांचे माणुसपण त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सम्यक समतेचा लढा सुरू केला. या पृथ्वी पाठीवरच्या कोणत्याही देशात असा सत्याग्रह झाला नाही, असा आगळा वेगळा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावा लागला. तो सत्याग्रह होता २० मार्च १९२७ चा ' महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह '. ज्या तळयात कुत्रे, मांजरं, गाई, म्हशी इ. जनावरे राजरोसपणे उतरून पाणी पीत होते. त्या तळयात या देशातील शुद्रांना पीता येऊ नये ही किती मोठी शोकांतिका ?

अशा अनेक लढयामधून मानव मुक्तीचा संदेश देणाऱ्या माणसाला माणुसपण देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकराबद्दल कृतज्ञ भावना व्यक्त करणाऱ्या गीतांची एक युग यात्राच आली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. यापुढे जाऊन असेही एक विधान करता येईल की जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चारित्र्यावर, विचारावर जेवढी कवने लिहिली गेली, ती एकाही युग पुरूषावर लिहिली गेली नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक चळवळीमुळे, संघर्षामुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे ज्यांना माणुसपण लाभले, आत्मभान लाभले, ज्यांना माणुसपणाचे सर्व हक्क मिळाले, अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले यावरून प्रा.डॉ. जाधव ज.तु. असे म्हणतात.

जैसे कोषात किटक होते गुंडाळूनी
तैसिच गत होती आमुची
आम्ही चुकलोरे कळुनी
छाया भिमाईची होताच हा कोष गेला रे गळूनी
अन अस्पृश्यतेचा काळोख सारा गेला रे पळूनी

भारतीय धर्म देव ही संकल्पना रूजविली, देवांची आणि दैवतांची महिमा मुक्त कंठाने गायीली. पण ३३ कोटी देवांच्या पैकी कोणत्याही एका देवाला येथील समाज व्यवस्थेतील अतिशुद्रांची किव आली नाही ना शुद्रांचा कळवळा आला नाही. या देवांनी दलितांचे दैन्य डोळे भरून पाहिले. पण त्या दैन्याला दूर करण्याचा साधा प्रयत्नही केला नाही, म्हणून शब्द जन्माला येतात.

बहुत झाले देव जगात अनेक त्यांची नांवं
पण कुणा आली न आमची किवं
म्हणूनच फिके वाटती भिमा
तुझ्यापुढे ही ३३ कोटी देव

(प्रा.डॉ. जाधव ज.तु.)

यातून कवीने बाबासाहेबांच्या गौरवशाली मुक्ती संग्रामाच्या मुक्त कंठाने प्रशंसा गायीली आहे.

शिवाय बाबासाहेबांनी वेगवेगळया पातळीवरून संघर्ष करतांना अनेक वेळा शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश देत. येथील वेदांनी आणि धर्म ग्रंथानी माणूस म्हणून जगण्याचे सगळेच मार्ग बंद केले होते. ज्ञानापासून इथला शुद्र समाज कोसो दूर होता. म्हणून इथला शुद्र लाचार आणि बौध्दिकदृष्टया दुबळा झाला. ही बौध्दीक गुलामगिरी नष्ट करायची असेल तर शिक्षण शिकल्या शिवाय प्रभावी पर्याय नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ' पीपल्स एज्युकेशन सोसायटीची ' स्थापना केली. अनेक महाविद्यालयांची उभारणी केली. यातून असंख्य दलितांना किंवा शुद्रांना शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला. म्हणून येथील दलित तरूण शिकू लागले अन शब्द साकारू लागले.

पोरं आमची शिकू लागली पिकू लागली फळं
पिक हाताशी आलं रस आंब्याचं गळं

(वामन कर्डक)

ज्ञान संपादन करून समाज मन बदलण्याचा प्रभावी प्रयत्न करण्याचा दलित तरूण प्रयत्न करू लागला. या प्रेरणेतून देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच ठळकपणे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही.

असं म्हणतात की, प्रत्येक कर्तव्यवान पुरूषाच्या जडण घडणीत त्यांच्या पत्नीचा मोलाचा सहभाग असतो. यांस डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील अपवाद नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहचारीणी सौ.रमाबाई यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व संघर्षात सहभागी जरी नसल्या तरी त्यांच्या कोणत्याही संघर्षाच्या क्षणी खंबीरपणे पाठीशी असायच्या. म्हणून डॉ. बाबासाहेबांचा प्रत्येक लढा यशस्वी व्हायचा याच संदर्भाने एक कवी म्हणतो.

भीम कीर्ती शिखरा पायी सान टेकडी
ठरली रमाई यशाची शिडी
स्वयं जीवनाला दुर लक्षीले
पतीला परंतु नित्य रक्षीले
दिसायाला होती जरी भोळी भावडी
ठरली रमाई यशाची शिडी

(प्रतापसिंग)

या गीतातून डॉ. बाबासाहेब आणि रमाई यांचा यथोचित गौरव कविने केलेला दिसतो. डॉ. बाबासाहेबांच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंग आंबेडकरी चळवळीतला कवी टिपण्याचा प्रयत्न करतो. भारताला १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं. पण स्वतंत्र देशाची राज्यघटना कोण लिहणार ? असा प्रश्न त्या काळात सर्व नेत्यांना पडलेला होता. म.गांधी, पंडित नेहरू हे तर अधिक गंभीर झाले. जगातल्या अनेक देशांच्या राज्यघटनेवर प्रभावी भाष्य करणारे डॉ. बाबासाहेब यांची आठवण मात्र कोणालाही होत नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीवर निवडून न येण्याचे सर्व प्रयत्न तत्कालीन काँग्रेस नेते समर्थपणे करीत होते. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व विरोधकांवर मात करीत घटना समितीवर निवडून येतात. आणि ज्यया व्यासांनी महाभारत लिहिलं त्या महाभारताची राज्यघटना तब्बल तीन वर्षे लिहून पूर्ण करतात. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणतात. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात म.गांधीनी महत्वाच योगदान दिलं. हे नाकारत नाही. पण ज्या ज्या राष्ट्रांची राज्यघटना ज्या ज्या राष्ट्र पुरूषांनी लिहिली त्यांची छायाचित्र त्या त्या देशाच्या चलनावर आली आहेत. मात्र आमच्या देशात हे होऊ शकत नाही. कारण इथली ही विषम समाज व्यवस्थाच कारणीभूत आहे. म्हणूनच एक कवी प्रश्न विचारतो.

कायदा भिमाचा फोटो गांधीचा
शोभून दिसतो का नोटावर ?
किती शोभला असता भिम नोटावर
टाय अन कोटावर

२६ जानेवारी १९५० रोजी आम्ही भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केला. आणि या साठ वर्षात आपल्या देशाला एक शिस्त लागली. कुणाच्या मनात असो अथवा नसो भारतीय राज्यघटनेचा स्वीकार करावाच लागतो. हे नग्न सत्य आहे.यातून एक गोष्ट सिध्द झाली भारतीय राज्यघटना डोळयासमोर ठेवूनच प्रत्येक राज्यकर्त्यांना राज्याचा, देशाचा शकट चालवावा लागतो. म्हणूनच देश एका विकासाच्या पर्वावर येऊन ठेपला आहे. आणि या पाठीमागे केवळ एकमेव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकच नाव आहे, असं कविला वाटल तर नवल वाटायला नको. म्हणून कवी म्हणतो.

बहोत आये चले गये जिनका न नाम निशां है |
एक भिम से भारत बदला लाखो में निराली शानं है |

(प्रा.डॉ. जाधव ज.तु.)

या शब्दातून देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वेगळेपण दिसून येते. बाबासाहेबांच्या बाबतीत आणखीन एक वैशिट सांगता येईल ते असे की, बाबासाहेबांच्या महापरिनिर्वानानंतर दलित समाजाला कर्तत्ववान, मार्गदर्शक, प्रभावी असा नेता मिळाला नाही. जे नेते उदयाला आले ते खुज्या विचारसरणीचे होते. आपला समाज नको त्या ठिकाणी बांधू लागले आणि बाबासाहेबांच्या रथाची गती मंदावत चालली. खुजे नेते आपापली पुरती पोळी भाजू लागले. याचं वैशम्य कवीला वाटल्याशिवाय राहत नाही. म्हणून कवी वामन कर्डक म्हणायला लागतात.

भिमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाच्या न्यारेच टोक असते.

म्हणजे एकीचे बळ किती महत्वाचे आहे, असा दिशादर्शक सल्ला कवी देऊ लागतो. १४ ऑक्टोंबर १९५६ साली विजया दशमीच्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नागाच्या नागपूर भूमीत तथागत भ.बुध्दाच्या बौध्द धम्माची दीक्षा घेतली आणि लाखो अनुयायांना परत दीक्षा दिली. समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या ओटीत त.भगवान बुध्दाचे तत्वज्ञान ओतप्रोत भरलेले आहे, याची जाणीव आंबेडकरी समाजाला होऊ लागली आणि कवी म्हणू लागला.

श्री बुध्दाच्या चरणावरती विजया दशमी दिनी
दीक्षा आम्हा दिली भिमाने मंगल दिन तो जनी
सौभाग्य हे दलित जनांचे भिमरत्न लाभले
व्यथा तयांचे दुर जहाले कार्य महा साधले
सोने लुटूनी मांगल्याचे लोक हर्षले मनी
दीक्षा आम्हा दिली भिमाने मंगल तो जनी

तथागत भ.बुध्दा बरोबरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान आहे, याची ओळख पटायला लागली.

६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. भारतातील तमाम बौध्द बांधवांचा वाली गेला.ही घटनाच अतिशय विदारक. या घटनेतून सावरण्याचं बळ एकाही तत्कालीन आंबेडकरी बांधवात नव्हतं. पण स्वत:ला सावरणं हे ही तितकचं महत्वाचं होत. या घटनेला शब्द बध्द करतांना लोकक कवी विष्णू शिंदे म्हणतात.

भीमरायाने सोडियले गाव पश मरणाने
कसा मरणाने सादीला डावरे
चंद्रमुनी सवे पंचशीला ही गाता गाता
शव हे माझ्या भिमाचे पाहिले दर्या किनारी जाता जाता

यातून एक गोष्ट स्पष्ट होते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यातील प्रत्येक घटनेला कवी शब्दबध्द करतांना दिसतो. अशी यशोगाथा जगातल्या कुठल्याही नेत्याच्या वाटयाला आली नाही. याच एकमेव कारण आहे या देशातील शुद्र,दलित यांच्या वाटयाला आलेलं हजारो वर्षापासून ज्या सडलेल्या नि नासलेल्या परंपरेत जगणं. हे जगणं इतक भयंकर होत की, शुद्राची सावली देखील अपवित्र वाटत होती. अशा समाजाचं दारिद्र्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठया सायासानं अंत्यत अल्पावधीत नाहीसं केलं. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरामुळे आत्मभान लाभलेला समाज आपल्या काळजावर कोंदून ठेवल्याशिवाय राहील काय ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या सम्यक क्रांती शिवाय आ चा दलित सन्मानाने जगण्याची , सर्व यशाची शिखरं गाठू शकला असता काय ? याची ही जाणीव कवीला आहे म्हणून

तु जर नसता सारेच नसते
आमचे हे जगणे जगणे नसते
तुच जागविल्या आमच्या साऱ्या
माणुसकीच्या खुणा भीमा गातो मी कवणा

अशी कतृज्ञेची भावना कवी व्यक्त करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्रावर न मोजता येण्या इतपत गाणी झाली पण विस्तार भयास्तव अतिविश्लेषण करणे शक्य नाही म्हणून इथे थांबतो.

**संदर्भग्रंथ**


१. पाऊलवाट, वामन कर्डक

२. माझ्या जिवनाचं गाणं, रविचंद्र हडसनकर

३. समग्र वामन कर्डक, डॉ.सागर जाधव

४. विद्रोही कविता,केशव मेश्राम

५. दलित साहित्य, विद्रोही आणि वेदना, डॉ.भालचंद्र फडके